# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : १०१ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com


## ऑगस्ट महिन्यात तब्बल 14 दिवस बँका राहणार बंद

मुंबई : जर तुम्हाला ऑगस्ट महिन्यात बँकेचे काही महत्त्वाचे व्यवहार किंवा कामे करायची असतील, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) ऑगस्ट २०२६ मधील बँकांच्या सुट्ट्यांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. या यादीनुसार, स्वातंत्र्य दिन, सण-उत्सव आणि साप्ताहिक सुट्ट्या मिळून देशातील विविध राज्यांमध्ये बँका एकूण १४ दिवस बंद राहणार आहेत.

## 'अॅट्रॉसिटी'चे खटले चालवण्यासाठी अहिल्यानगरला विशेष न्यायालय

अहिल्यानगर : अहिल्यानगरमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानूसार दाखल प्रकरणे चालवण्यासाठी अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासोबतच न्यायालयासाठी न्यायाधीशाच्या एका पदासह सात नियमित व बाह्य यंत्रणेकडून दोन कर्मचारी उपलब्ध करण्यास खर्चासह मंजुरी दिली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अॅट्रॉसिटीचे १०१४ खटले प्रलंबित आहेत.'अॅट्रॉसिटी'चे खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालय मंजूर झाले असले तरी त्याच्या स्वरूपाबद्दल अद्याप वकिलांमध्ये स्पष्टता नाही.

## थोडक्यात वार्ता

### सर्व मंत्र्यांना मिळणारी वृत्तपत्रे, नियतकालिके बंद



**मुंबई :** उपमुख्यमंत्री, विविध खात्यांचे मंत्री आणि राज्यमंत्री यांच्या मंत्रालयातील कार्यालयांसह निवासस्थानी वृत्तपत्रे व नियतकालिके पुरवण्याची गेल्या अनेक वर्षांपासून चालत आलेली मध्यवर्ती कार्यपद्धती राज्य शासनाने रद्द केली आहे. येत्या १ सप्टेंबरपासून या सर्व वृत्तपत्रांचा पुरवठा सामान्य प्रशासन विभागामार्फत (जीएडी) बंद करण्यात येणार असून, ही खरेदी व त्याची बिले मंजूर करण्याची जबाबदारी आता संबंधित मंत्र्यांच्या प्रशासकीय विभागांकडे सोपवण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय गुरुवारी जारी करण्यात आला. नवीन निर्णयानुसार, यापुढे प्रत्यक्ष कागदी वृत्तपत्रांपेक्षा डिजिटल वाचनाला प्राधान्य देत ऑनलाईन सदस्यता (डिजिटल सबस्क्रिप्शन) घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. मुख्यमंत्री कार्यालयासाठी मात्र वृत्तपत्र वितरणाची सध्याची पद्धत पूर्ववत सुरू राहील आणि त्यांचा खर्चही नेहमीप्रमाणे सामान्य प्रशासन विभागामार्फतच केला जाईल.


### अमेरिकी वृत्तपत्रात 'पाकिस्तानी काश्मीर' असा उल्लेख, भारताने नोंदवला तीव्र आक्षेप

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील भारतीय दूतावासाने एका अमेरिकन वर्तमानपत्राच्या वृत्ताच्या मथळ्यावर तीव्र आक्षेप नोंदवत 'पाकिस्तानी काश्मीर' असा कोणताही प्रदेश अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट केले आहे. दूतावासाने म्हटले आहे की, योग्य उल्लेख 'पाकिस्तानव्याप्त काश्मीर (पीओके)' असा आहे. सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना भारतीय दूतावासाने अमेरिकन वृत्तपत्राचा मथळा दिशाभूल करणारा आणि वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे म्हटले. दूतावासाने स्पष्ट केले की, 'पाकिस्तानी काश्मीर' अशी कोणतीही स्वतंत्र ओळख किंवा भौगोलिक एकक नाही.भारताने पुन्हा एकदा ठाम भूमिका मांडत जम्मू-काश्मीर आणि लदाख हे देशाचे अविभाज्य व अभिन्न भाग असल्याचे सांगितले आहे. भारताच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानने या प्रदेशातील काही भागांवर बेकायदेशीर कब्जा केला असून तेथील नागरिकांना दडपशाही आणि हिंसाचाराचा सामना करावा लागत आहे.

### नाशिक जिल्ह्यातील 16 शाळांना शिक्षण विभागाची नोटीस

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सोळा शाळांना राज्य शासनाची आवश्यक परवानगी न घेता शाळा सुरू ठेवल्याप्रकरणी शिक्षण विभागाने नोटीस पाठवली आहे. तसेच जिल्ह्यातील १६ अनधिकृत शाळांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या असून पालकांनाही पाल्यांचे तातडीने शासनमान्य शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. नियमानुसार इयत्ता पहिली ते सातवी, पाचवी ते आठवी तसेच आठवी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. २०१९ पूर्वी शिक्षण विभाग, शिक्षण उपसंचालक आणि शिक्षण संचालक कार्यालयामार्फत मान्यता दिली जात होती. मात्र, आता शाळांना ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाची पूर्वपरवानगी घेऊनच शाळा सुरु करावी लागते तरीही काही शाळांनी या सूचनांकडे कानाडोळा केल्याचं जिल्ह्यात पहायला मिळालं आहे.

### "शाल जोडे"




# अजिंठा लेणीची सुरक्षा रामभरोसे पोलीस पडताळणीविना कामगारांची फौज लेणीत अनर्थ घडल्यास जबाबदार कोण

हिंदू प्रकाशवार्ता । शेख हक्कानी



**फर्दापूर (प्रतिनिधी) :** जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या आणि अत्यंत संवेदनशील वारसा स्थळ मानल्या जाणाऱ्या अजिंठा लेणीच्या सुरक्षेशी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण' (ASI) कसा भयंकर खेळ खेळत आहे याचा एक संतापजनक पुरावा आता चव्हाट्यावर आला आहे लेणीमध्ये काम करणाऱ्या मजुरांचे कोणतेही पोलीस व्हेरिफिकेशन (चारित्र्य प्रमाणपत्र) आमच्याकडे नाही अशी धक्कादायक आणि मुजोर कबुली खुद्द ASI च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच अधिकृत पत्राद्वारे दिली आहे यावरून आता एकच जळजळीत सवाल उपस्थित होत आहे की उद्या या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या मजुरांकडून लेणीत काही अनुचित प्रकार घडला तर याची जबाबदारी कुणाची

या सुरक्षा घोटाळ्याचे काही मसालेदार आणि तिखट मुद्दे

प्रथम अपीलीय प्राधिकारी अरुण मलिक यांच्या पत्राने फुटला बॉम्ब

सामाजिक कार्यकर्ते मुकीम हकीम यांनी दाखल केलेल्या पहिल्या अपिलावर (दिनांक २२ जुलै २०२६) ASI च्या औरंगाबाद मंडळाचे अधीक्षण पुरातत्वविद आणि प्रथम अपीलीय प्राधिकारी अरुण मलिक यांनी जे लेखी उत्तर दिले आहे ते प्रशासनाच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारे आहे अधिकारी अरुण मलिक यांनी पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की कॅरेक्टर सर्टिफिकेट चारित्र्य प्रमाणपत्र या कार्यालयात उपलब्ध नाही याचाच सरळ अर्थ असा होतो की कंत्राटदाराने आणलेला मजूर कोण आहे त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का याची साधी शहानिशा करण्याची तसदीही या झोपलेल्या पुरातत्व विभागाने घेतलेली नाही

गुन्हेगारांना लेणीत 'एन्ट्री' मिळाली तर

अजिंठा लेणी हे 'जागतिक वारसा आहे जर पोलीस पडताळणीशिवाय कुणालाही आतमध्ये काम दिले जात असेल तर उद्या एखाद्या सराईत गुन्हेगाराने मजुराच्या वेशात आत प्रवेश मिळवला आणि लेणीचे किंवा एखाद्या आंतरराष्ट्रीय पर्यटकाचे काही नुकसान केले तर याला जबाबदार कोण सुरक्षेच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करणारा विभाग इतका आंधळा कसा असू शकतो

अनर्थ घडल्यास कॉलर कुणाची पकडायची कंत्राटदाराची की अधिकाऱ्याची

सर्वात मोठा आणि जनतेच्या मनातील सवाल हाच आहे की जर या बेजबाबदारपणामुळे अजिंठा लेणीत एखादी मोठी दुर्घटना घडली तर फासावर कुणाला लटकवायचे मजुरांचा पुरवठा करून आपली 'टक्केवारी मोजणाऱ्या त्या कंत्राटदाराची कॉलर पकडायची की आमच्याकडे प्रमाणपत्र उपलब्ध नाही' असे पत्रावर निर्लज्जपणे सही करून देणाऱ्या ASI च्या अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करायचे

प्रशासनाला शेवटचा खणखणीत इशारा

हा फक्त एका माहिती अधिकाराचा कागद नाही तर अजिंठा लेणीच्या सुरक्षेला लावलेला सुरुंग आहे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि राज्याच्या गुप्तचर यंत्रणांनी याची तातडीने दखल घ्यावी लेणीत काम करणाऱ्या प्रत्येक मजुराची तत्काळ पोलीस पडताळणी करावी आणि सुरक्षेशी खेळणाऱ्या या अधिकाऱ्यांवर आणि कंत्राटदारावर कडक कारवाई करावी अन्यथा जनतेलाच रस्त्यावर उतरावे लागेल.

# राज्यसभेतही पेपरफुटीविरोधी विधेयक मंजूर; दोषींना 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास, ₹10 कोटी दंड

## एआयद्वारे फसवणूक, सायबर हॅकिंग आणि संघटित पेपरफुटीवरही कठोर कारवाई



**दिल्ली:** लोकसभेनंतर राज्यसभेनेही पेपरफुटीविरोधी विधेयक आवाजी मतदानाने मंजूर केले आहे. या विधेयकामुळे परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. विधेयकात पेपरफुटी, संघटित फसवणूक, सायबर हॅकिंग आणि एआयचा वापर करून परीक्षा प्रक्रियेत हस्तक्षेप करणाऱ्यांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

या विधेयकानुसार, संघटित पद्धतीने पेपरफुटी करणाऱ्या किंवा फसवणुकीचे रॅकेट चालवणाऱ्या आरोपींना कमाल १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. तसेच दोषींवर १० कोटी रुपयांपर्यंत दंड आकारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. पेपरफुटीमुळे फेरपरीक्षा घ्यावी लागल्यास त्याचा संपूर्ण खर्चही दोषींकडून वसूल केला जाईल.

याशिवाय, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरून परीक्षा प्रक्रियेत फसवणूक करणे, ऑनलाइन प्रश्नपत्रिका प्रसारित करणे, परीक्षा प्रणाली हॅक करणे आणि इतर सायबर गैरप्रकारही या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहेत. परीक्षा घेणारी संस्था, सेवा प्रदाता, तंत्रज्ञान कंपनी किंवा संबंधित अधिकारी यांचा गैरप्रकारात सहभाग आढळल्यास त्यांच्याविरोधातही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

दरम्यान, भाजप नेते तरुण चुघ यांनी या विधेयकाचे स्वागत करत, विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा महत्त्वाचा निर्णय असल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी जलदगती न्यायालये, कठोर शिक्षा आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या विधेयकामुळे देशभरातील स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पोलिसांना पॅलेट गन वापरण्याचा अधिकार!



**नवी दिल्ली :** आंदोलनादरम्यान सुरक्षादलांकडून करण्यात येणाऱ्या 'पॅलेट गन' (पालखी किंवा छऱ्यांच्या बंदुकीचा) वापरावरून राजकारण पेटलेले असताना, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची टिप्पणी केली आहे. "कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी असाधारण परिस्थितीत पोलिसांना पॅलेट गन वापरण्याचा अधिकार आहे," असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने मेटल पॅलेट गनच्या वापरावर देशभरात पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या विशेष खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. माजी केंद्रीय माहिती आयुक्त तथा निवृत्त आयपीएस अधिकारी यशोवर्धन आझाद यांच्यासह दोन पीडितांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

## पृथ्वीराज चौहाण यांची उपायुक्तपदी बढती, तर सहायक आयुक्तपदावरील आठ अधिकाऱ्यांची खांदेपालट

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या मालमत्ता विभागाचे सहायक आयुक्त डॉ पृथ्वीराज चौहाण यांची उपायुक्त पदावर बढती देण्यात आली असून या त्यांच्याकडे आता उपायुक्त(मध्यवर्ती खरेदी खाते) यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर सहायक आयुक्त पदावरील आठ अधिकाऱ्यांची खांदेपालट करण्यात आली असून एम पूर्व विभागाचे सहायक आयुक्त उज्ज्वल इंगोले यांना ए विभागात तर सी विभागाच्या सहायक आयुक्त अलका ससाणे यांना पुन्हा एकदा एम पूर्व विभागात पाठवण्यात आले आहे. तर जी दक्षिण विभागाच्या सहायक आयुक्त स्वप्नजा क्षिरसागर यांच्याकडे या पदाचा भार कायम ठेवतानाच त्यांच्याकडे करनिर्धारण व संकलन विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेतील सहायक आयुक्तांपैंकी ए विभागाचे सहायक आयुक्त आणि करनिर्धारण व संकलन विभागाचा अतिरिक्त कार्यभारअसलेल्या गजानन बेल्लाळे यांची बदली मालमत्ता विभागाच्या सहायक आयुक्तपदावर करण्यात आला. तर टी विभागाच्या सहायक आयुक्त योगिता कोल्हे यांच्याकडे टी विभागाची जबाबदारी कायम ठेवतानाच सहायक आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन) पूर्व उपनगरेचा अतिरिक्त कार्यभार सोवण्यात आला आहे. तर सी विभागाच्या सहायक आयुक्तपदी जलअभियंता विभागातील कार्यकारी अभियंता सुनील माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तसेच त्यांच्याकडे बाजार विभागाच्या सहायक आयुक्तांचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर पर्जन्य जलवाहिनी विभागातील कार्यकारी अभियंता वनिता कोकाटे यांच्याकडे के दक्षिण विभागाचा पूर्णकालिन कार्यभार सोपवण्यात आला आहे.

यापूर्वी ए विभागाचे सहायक आयुक्त असलेल्या आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कार्यकारी अभियंता जयदीप मोरे यांच्याकडे १ ऑगस्ट २०२६ पासून एन विभागाच्या सहायक आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

## शेतरस्ता खुला करुन देण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भर पावसात मोर्चा



हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:-**जिंतूर तालुक्यातील खोलगाडगा येथील मागासवर्गीय शेतकऱ्यांचा अडवलेला शेतरस्ता, पांदन रस्ता खुला करण्यात यावा, कर्तव्यात गंभीर कसूर करणाऱ्या व मागासवर्गीय महिलांशी अरेरावी व अपमान करणाऱ्या जिंतूरच्या तहसीलदारावर अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ निलंबित करण्यात करावे, या मागणीसाठी रिपब्लिकन युवा सेनेचे वतीने जिल्हाध्यक्ष प्रीतम वाकळे यांच्या नेतृत्वात आज गुरूवार ३० जुलै रोजी परभणी जिल्हाधिकारी कार्यालसावर भर पावसात धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी तहसीलदारांवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे, रस्ता आमच्या हक्काचा नाही कुणाच्या बापाचा, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला

## जिंतूर-परभणी महामार्गावर चांदजवळ एसटी बस पलटली

### 26 प्रवासी जखमी; तिघांची प्रकृती गंभीर, जिल्हा रुग्णालयात हलविले



**जिंतूर (तालुका प्रतिनिधी) :** जिंतूर-परभणी महामार्गावरील चांदज गावाजवळ गुरुवारी (दि. ३० जुलै) सकाळी माजलगाव आगाराची परभणीकडे जाणारी एसटी बस पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात बसमधील २६ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव आगाराची एसटी बस सकाळी जिंतूर येथून ५१ प्रवाशांना घेऊन परभणीकडे निघाली होती. चांदज गावाजवळ आल्यानंतर अचानक चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघात होताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक नामदेव खडी यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. एसटी महामंडळाचे अधिकारी, वाहतूक विभागाचे कर्मचारी तसेच स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू करून जखमी प्रवाशांना बसमधून बाहेर काढले. त्यानंतर रुग्णवाहिकांच्या साहाय्याने सर्व जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. इतर जखमींवर जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान,अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून चालकाचे नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेचा पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे.

# धनश्री पठाडे हिचे ग्लोबल शेपर्स अॅन्युअल समिट - 2026 मध्ये प्रभावी प्रतिनिधीत्व




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याची कन्या धनश्री शेषराव पठाडे हिने नुकतेच स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मुख्यालयातील ग्लोबल शेपर्स अॅन्युअल समिट-२०२६ मध्ये पुणे हबचे प्रभावी प्रतिनिधीत्व करत जागतिक व्यासपीठावर कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

'सिग्नल्स फॉर फ्युचर' या मुख्य संकल्पनेवर आधारित या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगभरातील १२० हून अधिक देशांतील सुमारे ४५० युवा नेते सहभागी झाले होते. स्थानिक समस्यांवर युवकांच्या माध्यमातून शाश्वत उपाय शोधणे आणि जागतिक स्तरावर सकारात्मक बदल घडवणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. ग्लोबल शेपर्स कम्युनिटी ही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा एक भाग आहे.

विविध सत्रांत सहभाग

छत्रपती संभाजीनगरची धनश्री पठाडे सध्या ग्लोबल शेपर्स कम्युनिटी, पुणे हबच्या क्युरेटर म्हणून कार्यरत आहेत. या परिषदेदरम्यान तिने एआय, शाश्वत विकास, मानसिक व महिला आरोग्य, युवक रोजगार, प्लास्टिक प्रदूषण, डिजिटल सुरक्षितता आणि लॉन्जेव्हिटी इकॉनॉमी या विषयांवरील सत्रांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

* यशाची श्रेय ग्लोबल शेपर्स कम्युनिटीला या यशाचे श्रेय धनश्री पठाडे यांनी संपूर्ण ग्लोबल शेपर्स कम्युनिटी पुणे हबमधील सर्व शेपर्स, माजी सदस्य आणि आपल्या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येकाला दिले आहे. एका सामान्य मराठी मुलीवर विश्वास ठेवून, तिला नेतृत्वाची संधी देऊन आणि समाजासाठी काम करण्याचा आत्मविश्वास देणाऱ्या या समुदायामुळेच जागतिक स्तरावर पुणे हबचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याचे धनश्रीने सांगितले. यंदाच्या कार्यकाळात हरित कुमार ( व्हाईस क्युरेटर करत आहे) आणि शर्वरी रास्ते (Impact Officer) यांच्यासोबत धनश्री पठाडे पुणे हबच्या क्युरेटरशिप टीमचे नेतृत्व करत आहेत. २०१२ मध्ये अंशू गौर यांनी पुण्यात ग्लोबल शेपर्स हबची स्थापना केली. तेव्हापासून अनेक शेपर्स आणि माजी सदस्यांनी समाजाभिमुख कार्य, नेतृत्व आणि समुदायभावनेची समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. याच परंपरेचा आणि संस्कृतीचा वारसा पुढे नेत, पुणे हबने गेल्या अनेक वर्षांत उभा केलेला प्रभाव अधिक सक्षम करण्यासाठी आणि नव्या युवकांना समाजपरिवर्तनाच्या प्रवासात सहभागी करून घेण्यासाठी यंदाची क्युरेटरशिप टीम सातत्याने कार्यरत आहे.

### स्थानिक तरुणांनी पुढाकार घ्यावा



**मराठवाड्याच्या मातीतून सुरू झालेला प्रवास जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचू शकतो, हा विश्वास देणारा हा अनुभव आहे. येथील दुष्काळ, पाणीटंचाई, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढे येणे आवश्यक आहे. ग्लोबल शेपर्ससारखी व्यासपीठे त्यांना नक्कीच जागतिक मार्गदर्शन करून संधी मिळवून देतील.**

**- धनश्री पठाडे**

# संपादकीय

## एफडीएतील बंड: प्रशासकीय शिस्त आणि व्यावहारिक वास्तव यातील संघर्ष

अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे त्यांच्या अत्यंत कडक, शिस्तबद्ध आणि धडाकेबाज कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. जिथे जिथे त्यांची नियुक्ती होते, तिथे प्रशासनाला शिस्त लावणे आणि कामात गतिमानता आणणे हा त्यांचा नेहमीचाच खाक्या राहिला आहे. मात्र, यावेळी त्यांच्या या धडाकेबाज धोरणांचा धसका थेट त्यांच्याच विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतला असून, त्यांच्या कार्यपद्धतीविरोधात बंड पुकारले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए प्रयोगशाळेतील २९ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थेट अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मनमानी कारभाराविरोधात लेखी तक्रार दाखल केल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या संघर्षाच्या मुळाशी आहे ते अन्न, औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांच्या प्रलंबित नमुन्यांचे जलद गतीने विश्लेषण करण्याचे नवे धोरण. प्रयोगशाळेतील कामाचा निपटारा जलद व्हावा यासाठी अचानक दोन शिफ्टमध्ये काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सकाळी ९ ते रात्री उशिरापर्यंत काम करावे लागत असून, शनिवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही हजर राहण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत, असा कर्मचाऱ्यांचा आरोप आहे. एकीकडे शासकीय सेवा अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करणे हा प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हेतू असू शकतो, परंतु दुसरीकडे आवश्यक मनुष्यबळ आणि पुरेशा सुविधा न देता कर्मचाऱ्यांवर क्षमतेपेक्षा जास्त ताण देणे किती व्यावहारिक आहे, हा प्रश्न नक्कीच विचारला पाहिजे. औषधे आणि अन्नाची तपासणी हा विषय थेट नागरिकांच्या आरोग्याशी आणि जिवाशी जोडलेला आहे. अशा नाजूक आणि तांत्रिक कामात घाईगडबड किंवा विश्लेषकांवर अवाजवी दबाव आणल्यास तपासणीच्या गुणवत्तेवर आणि अचूकतेवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. एखाद्या औषधाचे किंवा अन्नाचे विश्लेषण चुकीचे झाले, तर त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागू शकतात. त्यामुळे केवळ आकडेवारी सुधारण्यासाठी किंवा प्रलंबित प्रकरणे शून्य करण्यासाठी तपासणीच्या गुणवत्तेशी तडजोड करणे धोक्याचे ठरू शकते. प्रशासनात कडक शिस्त आणि उत्तरदायित्व असणे अत्यंत गरजेचे आहे, यात शंकाच नाही. परंतु, कोणतीही नवी व्यवस्था लागू करताना कर्मचाऱ्यांची क्षमता, उपलब्ध मनुष्यबळ आणि त्यांच्या मूलभूत हक्कांचा विचार करणेही तितकेच आवश्यक असते. कार्यालयीन वेळ पूर्ववत करणे, सुट्ट्यांचा हक्क मिळणे आणि मुख्य म्हणजे रिक्त पदे भरून पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे या कर्मचाऱ्यांच्या मागण्या अवाजवी म्हणता येणार नाहीत. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी या प्रकरणात मध्यस्थी करून प्रशासकीय शिस्त आणि कर्मचाऱ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य यांचा समतोल साधणारा तोडगा लवकरात लवकर काढणे गरजेचे आहे, अन्यथा या प्रशासकीय संघर्षाचा फटका शेवटी सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याला बसू शकतो.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांतून घडणारी नवी पिढी : समता, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा

"ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे, तर कष्टकऱ्यांच्या तळहातावर पेललेली आहे," हा विचार केवळ एक वाक्य नाही; तो भारतीय समाजाला दिलेला श्रमाचा, समतेचा आणि स्वाभिमानाचा महामंत्र आहे. हा विचार ज्यांनी आपल्या लेखणीतून, शाहिरीतून आणि जीवनातून जगासमोर मांडला, ते म्हणजे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे.

अण्णा भाऊ साठे यांचे जीवन म्हणजे संघर्ष, स्वाभिमान, कष्ट आणि समाजपरिवर्तनाचा अखंड प्रवास होय. दारिद्र्य, उपेक्षा, भूक आणि सामाजिक विषमता यांच्या कठोर वास्तवात वाढलेल्या या लोकशाहीराने परिस्थितीपुढे कधीही हार मानली नाही. उलट त्याच परिस्थितीला आपल्या लेखणीची ताकद बनवत त्यांनी लाखो वंचित, शोषित आणि कष्टकरी जनतेच्या वेदनांना शब्द दिले. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजनासाठी नव्हते; ते माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारे सामाजिक आंदोलन होते.

आजच्या काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता झपाट्याने विकसित होत असताना समाजातील विषमता, अन्याय, बेरोजगारी, अंधश्रद्धा, जातीय विद्वेष आणि नैतिक मूल्यांची घसरण ही चिंताजनक वास्तवता आहे. अशा वेळी अण्णा भाऊ साठे यांचे विचार अधिकच प्रासंगिक ठरतात. कारण त्यांनी नेहमीच माणसाला केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्यासाठी जात, धर्म, भाषा किंवा संपत्तीपेक्षा माणुसकी मोठी होती.

साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य युवकांना केवळ वाचनाची प्रेरणा देत नाही, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, श्रमाचा सन्मान करण्याची जाणीव आणि समाजासाठी जगण्याची प्रेरणा देते.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा प्रत्येक शब्द हा समाजातील तळागाळातील माणसाच्या वेदनेतून जन्माला आलेला आहे. त्यांनी कधीही महालातील जीवनाचे वर्णन केले नाही; त्यांनी झोपडपट्टी, गिरणीकामगार, शेतमजूर, स्थलांतरित कामगार, कष्टकरी महिला आणि उपेक्षित समाजाचे वास्तव शब्दबद्ध केले. म्हणूनच त्यांच्या साहित्याशी सामान्य माणूस सहज जोडला जातो.

आज शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवण्यापुरते शिक्षण न घेता सामाजिक जबाबदारी स्वीकारणारे नागरिक बनणे आवश्यक आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचे वाचन विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान, सामाजिक समता, श्रमप्रतिष्ठा, बंधुभाव आणि संविधानिक मूल्यांबद्दलची निष्ठा निर्माण करू शकते. राष्ट्रनिर्मितीसाठी अशाच जागरूक आणि संवेदनशील तरुणाईची गरज आहे.

म्हणूनच अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून, नव्या विचारांचा आणि नव्या पिढीच्या घडणीचा संकल्पदिन ठरला पाहिजे. त्यांच्या साहित्याचे वाचन, विचारांचे चिंतन आणि मूल्यांचे आचरण हीच त्यांना खरी अभिवादनाची मानवंदना ठरेल.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नाही, तर ते भारतीय समाजाच्या वेदना, संघर्ष आणि परिवर्तनाची जिवंत गाथा आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून त्या समाजाचे प्रतिनिधित्व केले, ज्याचा आवाज मुख्य प्रवाहात क्वचितच ऐकू येत होता. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांमधून कष्टकरी, शेतमजूर, गिरणीकामगार, भटके-विमुक्त, दलित आणि उपेक्षित समाजाचे वास्तव प्रभावीपणे समोर आले.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार शिकवते. त्यांच्या प्रत्येक लेखनातून सामाजिक समता, श्रमप्रतिष्ठा, स्वाभिमान, बंधुता आणि न्याय यांचा ठाम पुरस्कार दिसून येतो. त्यांनी कोणत्याही व्यक्तीविषयी द्वेषाची भावना निर्माण केली नाही; मात्र अन्याय, शोषण आणि विषम व्यवस्थेविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे आवाज उठवला. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही परिवर्तनाची प्रेरणा देणारे मानले जाते.आजचा युवक माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात जगत असला, तरी त्याच्यासमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, सोशल मीडियाचा अतिरेक, नैराश्य, हिंसक प्रवृत्ती, असहिष्णुता आणि सामाजिक तुटलेपणा या समस्या वाढताना दिसतात. अशा वेळी अण्णा भाऊ साठे यांचे विचार युवकांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी संघर्षाला घाबरण्याऐवजी संघर्षातूनच यशाचा मार्ग शोधण्याचा संदेश दिला. अण्णा भाऊ साठे यांनी श्रमाला सर्वोच्च स्थान दिले. "कष्ट करणारा प्रत्येक हात हा समाजाचा खरा आधार आहे," ही भावना त्यांच्या साहित्याच्या प्रत्येक पानातून जाणवते. आज अनेक युवक यशाचा शॉर्टकट शोधतात; मात्र अण्णा भाऊ साठे यांचे जीवन सांगते की प्रामाणिक श्रम, जिद्द, चिकाटी आणि सामाजिक बांधिलकी यांच्याशिवाय खरे यश मिळत नाही.आज शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षणाचीही गरज आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये अधिक व्यापक झाले, तर विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, मानवता आणि लोकशाहीविषयी अधिक जागरूकता निर्माण होईल. शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळवणे नसून, जबाबदार नागरिक घडवणे हा आहे, हे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

समाजपरिवर्तनासाठी केवळ सरकार किंवा एखादी संस्था पुरेशी नसते; जागृत नागरिकांची आवश्यकता असते. प्रत्येक युवकाने आपल्या परिसरातील अन्याय, अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, शिक्षण आणि सामाजिक सेवेसाठी पुढाकार घेतला, तर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचे खरे स्मरण होईल. त्यांच्या विचारांचे अनुकरण म्हणजे केवळ जयंती साजरी करणे नव्हे, तर समाजासाठी काहीतरी सकारात्मक करून दाखवणे होय.

आजच्या नव्या भारताला तंत्रज्ञानाबरोबरच संवेदनशीलता, विज्ञानाबरोबरच विवेक, विकासाबरोबरच सामाजिक न्याय आणि प्रगतीबरोबरच माणुसकीचीही गरज आहे. ही मूल्ये अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यामध्ये ठळकपणे दिसून येतात. त्यामुळे त्यांचे विचार हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहेत.

नवा भारत केवळ आधुनिक तंत्रज्ञान,आर्थिक प्रगतीने घडत नाही; तो घडतो विचारांनी, मूल्यांनी, संवेदनशीलतेने आणि माणुसकीने. समाजातील शेवटच्या घटकाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची जाणीव ज्या पिढीत असेल, तीच खरी प्रगत पिढी ठरते. हीच शिकवण साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या जीवनातून आणि साहित्याद्वारे दिली.आज आपल्या देशात शिक्षण, विज्ञान आणि संधींचे अनेक दरवाजे खुले झाले आहेत. मात्र त्याच वेळी सामाजिक विषमता, द्वेष, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, पर्यावरणाचे प्रश्न आणि नैतिक मूल्यांची घसरण ही मोठी आव्हानेही उभी आहेत. या प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत; तर संवेदनशील, विवेकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारी तरुणाई आवश्यक आहे. अशी तरुणाई घडविण्याची ताकद अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांत आहे.अण्णा भाऊ साठे यांनी कधीही निराशेचा मार्ग स्वीकारला नाही. त्यांनी संघर्ष केला, पण संघर्षातून आशा निर्माण केली. त्यांनी वेदना अनुभवल्या, पण त्या वेदनांना परिवर्तनाची भाषा दिली. त्यांनी अन्याय पाहिला, पण अन्यायाला शरण जाण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. म्हणूनच त्यांचे विचार कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवतेचे विचार आहेत.

आज प्रत्येक शाळेत, प्रत्येक महाविद्यालयात, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य पोहोचणे ही काळाची गरज आहे. कारण त्यांच्या साहित्याचे वाचन करणारा युवक केवळ यशस्वी होण्याचा विचार करत नाही, तर समाजालाही यशस्वी करण्याची जबाबदारी स्वीकारतो. तो माणसातील माणूस शोधतो. तो समतेचा, बंधुभावाचा आणि संविधानिक मूल्यांचा सन्मान करतो.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे हे केवळ एका जयंतीपुरते आठवायचे व्यक्तिमत्त्व नाही. ते चालत राहणारी विचारधारा आहेत. ते संघर्षातून उभा राहिलेला स्वाभिमान आहेत. ते कष्टकऱ्यांच्या हातातील विश्वास आहेत. ते उपेक्षितांच्या डोळ्यातील आशेचा किरण आहेत.

आज जर आपण त्यांच्या प्रतिमेला हार घालून, भाषणे करून आणि घोषणांनी त्यांचे स्मरण केले; पण त्यांच्या विचारांना आपल्या आचरणात स्थान दिले नाही, तर ते स्मरण अपूर्ण राहील. त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली तेव्हाच ठरेल, जेव्हा आपल्या समाजात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, एकही कष्टकरी अपमानित होणार नाही, एकही माणूस जाती-धर्माच्या नावाने तिरस्कृत होणार नाही आणि प्रत्येक नागरिक स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार अनुभवेल.

एखादा माणूस काळाच्या पडद्याआड जातो तेव्हा त्यांचे विचार अमर राहतात. अण्णा भाऊ साठे आज आपल्या सोबत नसतील, पण त्यांच्या लेखणीतील वेदना अजूनही समाजाच्या हृदयात धडधडत आहेत. त्यांच्या शब्दांतील आशा अजूनही लाखो युवकांच्या स्वप्नांना दिशा देत आहे.त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ पुष्प अर्पण करू नयेत; तर आपल्या मनात माणुसकीचे एक बीज रुजवूया. प्रत्येक अन्यायाविरुद्ध आवाज उठवूया. प्रत्येक कष्टकऱ्याचा सन्मान करूया. प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी देऊया. प्रत्येक माणसाला माणूस म्हणून स्वीकारूया.हीच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना सर्वात मोठी मानवंदना ठरेल... आणि त्यांच्या विचारांतून घडणारी नवी पिढीच उद्याच्या समतामूलक, सशक्त आणि मानवतावादी भारताचा खरा पाया ठरेल.लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

लेखक
रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे
छत्रपती संभाजीनगर
मो.नं.8888125610

# कौटुंबिक वादातून विवाहितेच्या भावावर धारदार हत्यार व लाकडी दांड्याने प्राणघातक हल्ला; गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कौटुंबिक वादाच्या कारणावरून बापा-लेकाने मिळून विवाहितेच्या भावावर धारदार हत्याराने व लाकडी दांड्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना सिल्कमिल कॉलनी परिसरात घडली आहे. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार शेख अब्दुल समद शेख हबीब (वय ४२ वर्षे, रा. सिल्कमिल कॉलनी, छत्रपती संभाजीनगर) हे आर्किटेक्टकडे खाजगी नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. त्यांची बहीण फरहीन बेगम शेख सरफराज यांचे पती शेख सरफराज शेख हलीम यांच्यासोबत कौटुंबिक वाद सुरू असून त्याविषयी न्यायालयात व पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल आहेत. याच वादातून आरोपी शेख सरफराज हा तक्रारदाराकडे नेहमी पैशाची मागणी करत होता. माहिती मिळताच तक्रारदार तात्काळ आपल्या चारचाकी वाहनाने घरी पोहोचले. तिथे आरोपी भावजयीला शिवीगाळ करत असल्यामुळे, तक्रारदाराने त्यांना "शिवीगाळ करू नका, आपण घरात बसून बोलू," असे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. याचा राग आल्याने मुख्य आरोपी शेख सरफराज याने त्याच्याकडील धारदार हत्याराने वार केला, जो चुकवण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने पाठीमागून गालावर चापट मारली व धारदार वस्तूने डाव्या डोळ्याच्या बाजूला गालावर वार करून गंभीर जखमी केले.

यावेळी दुसरा आरोपी मुलगा अब्दुल रहीम शेख याने त्याच्याकडील लाकडी दांड्याने तक्रारदाराच्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर, डोक्यावर व पाठीवर मारहाण केली. तसेच मुख्य आरोपी सरफराज याने तक्रारदाराच्या शर्टच्या खिशातील ग्राहकाचे ठेवलेले १२,००० रुपये (५०० च्या नोटा) काढून घेतले आणि "२५ लाख रुपये द्या, नाहीतर तुझ्या बहिणीस नांदवणार नाही," अशी धमकी दिली. तक्रारदाराने आरडाओरड केल्यामुळे जावेद हुशेन महमुद हुशेन, शेख अब्दुल हमीद शेख सईद व इतर, भांडण सोडवण्यासाठी धावून आले. त्यानंतर पोलिसांनी घटना स्थळी पोहोचून आरोपी सरफराज याला ताब्यात घेतले, तर त्याचा मुलगा अब्दुल रहीम हा पोलिसांच्या जानापूर्वीच पळून गेला. तक्रारदाराला उपचारासाठी घाटी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे डाव्या डोळ्याच्या बाजूला गालावर टाके घालण्यात आले. यापूर्वीदेखील १५ जून २०२६ रोजी सातारा पोलीस ठाण्यात बहिणीच्या नवऱ्यावर गुन्हा दाखल असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आली असून सातारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ११५(२), ११९(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मारुती हरी खिल्लारे करीत आहेत.

# मातोश्रीवर डॉ. रमेश मस्के यांनी घेतली शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सदिच्छा भेट

## आरोग्य व सामाजिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा




**मुंबई / हिंगोली :** हिंगोली येथील प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ व शिवसेनेचे डॉ. रमेश मस्के नाईक ( ए म बी बी ए स , एमएस – ऑर्थो सर्जन) यांनी मुंबई येथील मातोश्री निवासस्थानी जाऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आदरणीय उद्धव ठाकरे साहेबांनी अत्यंत आपुलकीने डॉ. मस्के यांची विचारपूस केली. हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या विविध समस्या, ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, तसेच डॉ. मस्के साहेबांनी वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची सविस्तर माहिती जाणून घेतली.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेशभाऊ देशमुख यांनी, "येणारा काळ आपलाच असेल," असा विश्वास व्यक्त करत हिंगोली जिल्ह्यातील पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत तसेच शेतकरी, सामाजिक आणि संघटनात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगितले. भेटीदरम्यान विविध राजकीय, सामाजिक व जनहिताच्या विषयांवर मनमोकळ्या वातावरणात संवाद झाला. उद्धव ठाकरे यांनी दिलेला वेळ, दाखविलेली आत्मीयता आणि कार्यकर्त्यांशी साधलेला थेट संवाद यामुळे उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी डॉ. रमेश मस्के नाईक हॉस्पिटल यांनी हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि रुग्णांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# ग्रीव्हज कॉटन कंपनीतून सव्वादोन लाखांचे मशिनरी पार्ट्स लांबवले

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील बहुचर्चित ग्रीव्हज कॉटन कंपनीत सुरक्षेचा बोजवारा उडाला असून, सुरक्षा यंत्रणेच्या डोळ्यात धूळ फेकत चोरांनी चक्क २ लाख ३२ हजार रुपयांचे मशिनरी पार्ट्स लंपास केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. सुरक्षा एजन्सीचा दावा फोल ठरवत मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या दुसाहसी चोरीमुळे औद्योगिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार ग्रीव्हज कॉटन कंपनीला खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी कडून मनुष्यबळ पुरवण्यात येते. एजन्सीचे फिल्ड ऑफिसर म्हणून काम पाहणारे जितेंद्रसिंग उदयसिंग पाटील (वय ५८, रा. उल्कानगरी, गारखेडा परिसर) यांना कंपनीचे एचआर व ॲडमिन विभागाचे उपमहाव्यवस्थापक मनी बस्तोला यांनी ई-मेल पाठवून कंपनीत चोरी झाल्याची माहिती दिली. २७ जुलै रोजी मध्यरात्रीनंतर साडेबाराच्या सुमारास हा प्रकार घडल्याचे सांगत तात्काळ येऊन सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सांगण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये २७ जुलै रोजी मध्यरात्री साडेबारा ते अडीचच्या सुमारास दोन संशयित चोरटे कंपनीत वावरताना दिसले. त्यातील एकाच्या चेहऱ्याला कापड बांधलेले होते, तर दुसरा व्यक्ती खाली वाकल्यामुळे त्याचा चेहरा स्पष्टपणे कॅमेऱ्यात येऊ शकला नाही. या दोघांनी कंपनीच्या अतिसंवेदनशील टेस्टिंग विभागाला लक्ष करत तिथले तब्बल २ लाख ३२ हजार २०० रुपये किमतीचे मशिनरी पार्ट्स अलगद उचलून नेले.

सुरक्षा व्यवस्थेचे तीन तेरा वाजल्याचे या घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, एजन्सीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. याप्रकरणी जितेंद्रसिंग पाटील यांच्या तक्रारीवरून सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार संतोष सोनावणे अत्यंत वेगाने करत आहेत.

# परभणी जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:-** हवन विभागाकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार परभणी जिल्ह्यासाठी पावसाचा रेट देण्यात आला आहे वादळी वारे व विजांच्या कडकडासह अतिवृष्टीची शक्यता आहे विशेष सतर्कता व खबरदारी बाळगावी असे आवाहन करण्यात आले आहे.



बुधवारी दुपारपासूनच पावसाला सुरुवात झाली गुरुवार सकाळपासूनच पावसाने जोर धरला जिल्ह्यात सर्व दूर मुसळधार पावसाची चळक सुरू असून हवामान खात्याने जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे नागरिकांनी अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये प्रवास करणे टाळावे नदी नाले ओढे पूल बंधारे तसेच सकल पूर प्रवण भागात जाणे टाळावे पाण्याचा प्रवाह असलेल्या रस्त्यावरून व पुलावरून वाहन नेण्याचा प्रयत्न करू नये विजांच्या कडकडाटसह सुरू असताना झाडाखाली विद्युत खांबाजवळ मोकळ्या जागेत नदी नाल्याच्या पाणी पातळीत अचानक वाढ होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनाचे काटकोन पणे पालन करावे कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये असे आवाहन सतर्क बाळगा व घाबरू नका उद्भवल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची संपर्क साधावा नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क व सुरक्षित रहावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन संजय सिंह चव्हाण जिल्हाधिकारी परभणी यांनी केले.

# करंजगावात गरोदर मातांना पोषण आहार किटचे वाटप

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**करंजगाव :** संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी आणि एच. जी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करंजगाव येथे गरोदर मातांसाठी पोषण आहार किट वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. माता व बालकांचे आरोग्य सुदृढ राहावे, गरोदर महिलांना आवश्यक पोषण मिळावे आणि कुपोषणमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी गरोदर महिलांना संतुलित आहाराचे महत्त्व, नियमित आरोग्य तपासणी, वेळेवर लसीकरण, हिमोग्लोबिनची पातळी टिकवून ठेवणे तसेच गर्भावस्थेदरम्यान घ्यावयाच्या आवश्यक काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर महिलांना पौष्टिक खाद्यपदार्थांचा समावेश असलेल्या पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. लाभार्थी महिलांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रमास संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटीचे प्रोग्राम कोऑर्डिनेटर सचिन लिमकर, इर्शाद सय्यद, कृष्णा सरोवर तसेच एच. जी. इन्फ्राचे शुभम सर उपस्थित होते. याशिवाय अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामस्थ व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. ग्रामीण भागातील माता-बालकांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून भविष्यातही सामाजिक विकासासाठी विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# हनुमान टेकडी परिसरात सायंकाळी सहा नंतर थांबण्यास सक्त मनाई

## दामिनी पथकासह गस्त तीव्र; छेडछाड व धिंगाणा घालणाऱ्या टवाळखोरांना पोलीस देताहेत हुसकावून

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील ऐतिहासिक हनुमान टेकडी, बुद्धलेणी आणि निपट निरंजन महाराज परिसरासह छत्रपती संभाजीनगर लेणी परिसरात गुंड, टवाळखोराचा वाढता वावर आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी बेगमपुरा पोलिसांनी आता कठोर भूमिका घेतली आहे. सायंकाळी साडेसहा वाजेनंतर या डोंगर परिसरात नागरिकांना व पर्यटकांना थांबण्यास मज्जाव करण्यात आला असून, पोलिसांकडून कडक गस्त घालून टवाळखोरांना हुसकावून लावले जात आहे. अलीकडेच बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी स्वतः हनुमान टेकडी परिसराची पाहणी करून सुरक्षेचा सविस्तर आढावा घेतला होता. फिरण्याच्या बहाण्याने या रमणीय भागात येऊन संध्याकाळनंतर दारू पिऊन धिंगाणा घालणे, अश्लील चाळे करणे आणि महिला व तरुणींची छेडछाड करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले होते. या गंभीर बाबींची दखल घेत पोलिसांनी आता या भागात कडक बंधने लागू केली आहेत.

काही दिवसांपूर्वी मद्यपी टवाळखोरांनी दोन तरुणींची छेड काढली होती. त्यांना विरोध करणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्यालाही धिंगाणा घालणाऱ्यांनी मारहाण केली होती. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई करत टवाळखोरांना बेड्या ठोकल्या होत्या. आरोपींना अटक केल्यानंतर त्यांच्या नातेवाईक व समर्थकांनी थेट पोलीस ठाण्यावरच हल्ला केल्याची संतापजनक घटना समोर आली होती. या वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर आणि पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर आले आहेत.

# रजोनिवृत्ती व पीसीओडी विषयावरील राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन

## महिलांच्या आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्यव्यापी उपक्रम; राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महिलांच्या आरोग्याशी संबंधित रजोनिवृत्ती (Menopause) आणि पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओडी/पीसीओएस) विषयक आरोग्यसेवा अधिक प्रभावी व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने आयोजित राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन गुरुवारी महात्मा गांधी मिशन (एमजीएम) वैद्यकीय महाविद्यालयाच्या दयान हॉल येथे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक डॉ. आशीष भारती, डॉ. कांचन वानोरे, डॉ. दयानंद मोतीपवळे, डॉ. रेखा भंडारे, डॉ. प्रशांत हिंगणकर (युनिसेफ), डॉ. मंगेश गढरी (युनिसेफ), डॉ. श्रीनिवास गडप्पा, डॉ. संतोष कडले, डॉ. सुरेश रावते, डॉ. विनायक खेडकर, डॉ. अभय धानोरकर, डॉ. कमलाकर मुदखेडकर, डॉ. पद्मजा सराफ, डॉ. राहुल चव्हाण, डॉ. पल्लवी पघडाल, श्री. राहुल अनेराव, डॉ. ज्ञानोबा भोसले यांच्यासह आरोग्य विभागातील वरिष्ठ



अधिकारी, तज्ज्ञ आणि मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत राज्यातील सर्व जिल्ह्यांतील स्त्रीरोगतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

कार्यशाळेदरम्यान रजोनिवृत्ती व्यवस्थापन, पीसीओडीचे निदान व उपचार, प्रभावी समुपदेशन, आरोग्यदायी जीवनशैली, मानसिक व शारीरिक आरोग्य तसेच आधुनिक उपचारपद्धती यांसारख्या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रे आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य अधिक विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

यावेळी तज्ज्ञांनी सांगितले की, बदलती जीवनशैली, अयोग्य आहार, शारीरिक हालचालींचा अभाव आणि वाढता ताण यामुळे पीसीओएसचे प्रमाण वाढत आहे. वेळेत निदान, योग्य समुपदेशन आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब केल्यास हा विकार प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो.

महिलांच्या आरोग्यसेवांची गुणवत्ता अधिक उंचावणे, रजोनिवृत्ती व पीसीओडीग्रस्त महिलांना सर्वसमावेशक व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकसित करणे या दृष्टीने ही राज्यस्तरीय कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शिवना येथे घरकुल लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) 2026 अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नव्या घरात प्रवेश करताना लाभार्थी व त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

यावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम, ग्रामपंचायत प्रशासक डॉ. सलमान खान, ग्रामरोजगार सेवक मोबिन सर, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल, शेख कासिम, ग्रामपंचायत ऑपरेटर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी लाभार्थ्यांचे अभिनंदन करून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ही ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना सुरक्षित, सन्मानाचे व कायमस्वरूपी घर उपलब्ध करून देणारी महत्त्वपूर्ण योजना असल्याचे सांगितले. तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत लाभार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा गृहप्रवेश सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

# शासकीय आयटीआयची चौथी प्रवेश फेरी 31 जुलैपासून; 23 ट्रेडसाठी 840 जागा उपलब्ध

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी.

**परभणी,:** गोंधळ महर्षी राजारामबापू कदम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), येथील प्रवेश प्रक्रिया 2026 अंतर्गत चौथी प्रवेश फेरी 31 जुलै ते 4 ऑगस्ट 2026 या कालावधीत राबविण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य विकास आडे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. यंदा संस्थेतील 23 ट्रेडसाठी एकूण 840 जागा उपलब्ध असून, प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने गुणवत्तेनुसार राबविण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवार व पालकांनी प्रवेशाचे वेळापत्रक लक्षात घेऊन विहित मुदतीत आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना व व्हिडिओ तसेच अन्य माहिती https:**//admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शहरी व ग्रामीण भागातील इच्छुक युवक-युवतींनी संकेतस्थळावरील माहितीचा उपयोग करून मूळ कागदपत्रांसह वेळापत्रकानुसार आयटीआयमध्ये उपस्थित राहून प्रवेश निश्चित करावा. निवड यादीत नाव आल्यानंतर उमेदवारांनी अलॉटमेंट लेटरसह संबंधित आयटीआयमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच उमेदवारांच्या सोयीसाठी संस्थेत मदत केंद्राचीही स्थापना करण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्राचार्य विकास आडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. प्रवेश समिती प्रमुख म्हणून गटनिर्देशक गोपाळ घायाळ, उपप्रमुख म्हणून गटनिर्देशक मधुकर ब्राह्मणे तसेच संदीपान वाघमारे, यू. आर. गवई, पी. आर. गाडेकर, कोकणे, बी. जी. जाधव, पी. डी. बालटकर आणि एस. आर. उबाळे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समित्यांमध्ये समावेश आहे. याशिवाय प्रवेश अर्ज तपासणी, प्रवेश मार्गदर्शन व चौकशी, मूळ कागदपत्र तपासणी, रोखपाल, विद्युत, साहित्य पुरवठा आणि प्रसिद्धी आदी समित्यांचीही स्थापना करण्यात आली असून, या समित्यांच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ व सुरळीत राबविण्यात येणार असल्याचे प्राचार्य विकास आडे यांनी नमूद केले आहे.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषदेचे उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या भारतीय तथा विदेशी भाषा संस्था आणि केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने वीरशासन जयंतीनिमित्त आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषदेचे उद्घाटन एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात उत्साहात झाले. 'लोकभाषा प्राकृत - भारतीय विचार-परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा' या विषयावरील परिषदेत देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि प्राकृत भाषा अभ्यासक सहभागी झाले आहेत.



उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. वीरसागर जैन, प्रा. डॉ. श्रीयंश कुमार सिंघाई, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्रा. संजय मोहोड, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके आणि संचालक डॉ. के. पी. सिंह उपस्थित होते.

प्रा. डॉ. श्रीयंश कुमार सिंघाई यांनी प्राकृत भाषेत भारतीय संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि जैन आगमांचा अमूल्य ठेवा जतन झाल्याचे सांगत तिच्या अभ्यासाची गरज अधोरेखित केली. प्रा. डॉ. वीरसागर जैन यांनी प्राकृत भाषेत संशोधनासाठी अमर्याद संधी उपलब्ध असून युवा संशोधकांनी या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन केले.

कुलपती अंकुशराव कदम यांनी प्राकृत ही भारतीय संस्कृतीचे वैभव जपणारी प्राचीन भाषा असल्याचे सांगितले, तर कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी एमजीएम विद्यापीठ भाषाविषयक संशोधनाला सातत्याने प्रोत्साहन देत असल्याचे नमूद केले.

यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच सकल जैन समाजाच्या वतीने एमजीएम विद्यापीठाच्या ग्रंथालयाला जैन साहित्यावरील पुस्तकांची भेट देण्यात आली. परिषदेत पुढील दोन दिवस प्राकृत भाषा, भारतीय विचारपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाशी संबंधित विविध विषयांवरील शोधनिबंध सादरीकरण व शैक्षणिक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीला रोटरी परिवाराची अनोखी समाजसेवा; 'सेवा हीच भक्ती'चा दिला संदेश



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने छत्रपती संभाजीनगर रोटरी परिवारातर्फे आयोजित "रोटरी आषाढी २०२६" या उपक्रमातून भक्ती आणि समाजसेवेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. वाळूज येथील छोटे पंढरपूर परिसरात हजारो भाविकांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर, मोफत जयपूर फूट नोंदणी, मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया नोंदणी, स्वच्छता अभियान तसेच प्रसाद वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डीजीएन रो. सतीश लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रो. मच्छिंद्र कुंभार, रो. जितेंद्र डोबोले, रो. पाराजी चितळे, रो. आप्पासाहेब काकडे आणि विष्णुदास पाटील यांनी विशेष योगदान दिले.

यावेळी रोटरी COPPSचे अध्यक्ष रो. हेमंत लांडगे, कोषाध्यक्ष रो. अमित कोरडे, रो. स्वाती स्मार्त, रो. विजय जयस्वाल, रो. उद्धव शिरसाट, रो. विवेक कानडे, रो. ब्रतबानी गोस्वामी, रो. मुकुंद पागे, रो. माधुरी जोशी, रो. संगीता तांबट, रो. भारत चोपडे, रो. मनोज देशमुख तसेच सर्व सहभागी रोटरी सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या लोकसंपर्क उपक्रमाच्या वेळापत्रकात बदल

## येत्या सोमवारपासून सोयगाव येथे नागरिकांच्या समस्या जाणून घेणार

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.३० जुलै :** सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या विविध शासकीय कामांशी संबंधित अडीअडचणी,तक्रारी व समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या लोकसंपर्क उपक्रमाच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.



पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार आज शुक्रवार रोजी सोयगाव येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयात लोकसंपर्क उपक्रम आयोजित करण्यात येणार होता.मात्र,अपरिहार्य कारणास्तव या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून येत्या सोमवारपासून हा उपक्रम नव्या वेळापत्रकानुसार सुरू होणार आहे.येत्या सोमवारी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत आमदार अब्दुल सत्तार हे पंचायत समिती, सोयगाव येथे उपस्थित राहून नागरिकांच्या विविध शासकीय कामांशी संबंधित अडीअडचणी,तक्रारी व अर्ज स्वीकारून संबंधित विभागांना आवश्यक सूचना देणार आहेत. तसेच दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत तहसील कार्यालय,सोयगाव येथे उपस्थित राहून नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. यापुढे हा लोकसंपर्क उपक्रम दर पंधरा दिवसांनी आलटून-पालटून सिल्लोड व सोयगाव येथे आयोजित करण्यात येणार आहे.एका सोमवारी सोयगाव येथे तर त्यानंतरच्या सोमवारी सिल्लोड येथे हा उपक्रम राबविण्यात येईल. त्यामुळे दोन्ही तालुक्यांतील नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडता येणार असून शासकीय कामांबाबत मार्गदर्शन व पाठपुरावा करता येणार आहे.

या लोकसंपर्क उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपल्या शासकीय कामांशी संबंधित आवश्यक अर्ज, कागदपत्रे व पुरावे सोबत आणावेत.तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, शासनाच्या विविध योजनांची माहिती घ्यावी व योजनांचा लाभ मिळवून घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'पराक्रम दिना' निमित्त राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 18 ऑगस्ट हा दिवस राज्यभर 'पराक्रम दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व राष्ट्रनिष्ठेचा परिचय नवीन पिढीला व्हावा, या उद्देशाने राज्यभर 1 ते 15 ऑगस्ट 2026 या कालावधीत विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

पराक्रम दिन साजरा करण्यासंदर्भात अमृत संस्थेमार्फत 'पराक्रम दिन समिती' स्थापन करण्यात आलेली असून त्या समितीमध्ये काकासाहेब विधाते, पांडुरंग बलकवडे, जगन्नाथ लडकत, मोहन शेटे, मंगेश खाडिलकर, कौमुदी परांजपे या दिग्गज इतिहासतज्ज्ञ व अभ्यासकांचा समावेश आहे.

या पराक्रम दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये व खुल्या गटातील नागरिकांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून जास्तीत जास्त नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

**'पराक्रम दिन' स्पर्धांचे गट व स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. निबंध स्पर्धा :** शालेय गट, महाविद्यालयीन गट व खुला गट. निबंधाची शब्दमर्यादा जास्तीत जास्त 1000 शब्द असून मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत टाईप करून त्याची PDF फाईल अपलोड करावी. निबंधासाठी लागणारे संदर्भ 'अमृत पराक्रम दिन'च्या संकेतस्थळावरील लिंक्स, संदर्भ पुस्तके व माहिती पुस्तिकेवरच आधारित असावेत. बक्षीसपात्र निबंधांबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

वक्तृत्व स्पर्धा शालेय गट, महाविद्यालयीन गट व खुला गट. स्पर्धकाने स्वभाषणातील जास्तीत जास्त 7 मिनिटांचा व्हिडिओ सादर करणे अपेक्षित आहे. व्हिडिओ स्वतःचा, ओरिजिनल, स्पष्ट व ठळक आवाजातील असावा. व्हिडिओमध्ये कोणतेही व्हिज्युअल इफेक्ट्स, साऊंड इफेक्ट्स किंवा AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) जनरेटेड इमेजेस वापरू नयेत. उत्तम गुणवत्तेचा व्हिडिओ तयार करून 'अमृत पराक्रम दिन'च्या वेबसाईटवर अपलोड करावा. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

# रजोनिवृत्ती व पीसीओडी विषयावरील कार्यशाळेचे मेघना साकोरे-बोर्डीकरांच्या हस्ते उद्घाटन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** महिलांच्या आरोग्याशी संबंधित रजोनिवृत्ती (Menopause) आणि पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (PCOD/PCOS) विषयक आरोग्यसेवा अधिक सक्षम व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन आज महात्मा गांधी मिशन (एम.जी.एम.) वैद्यकीय महाविद्यालयाच्या दयान हॉल येथे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक डॉ. आशीष भारती, डॉ. कांचन वानोरे, डॉ. आशिष भारती, डॉ. दयानंद मोतीपवळे, डॉ. प्रशांत हिंगणकर (युनिसेफ), डॉ. मंगेश गढरी (युनिसेफ), डॉ. श्रीनिवास गडप्पा, डॉ. संतोष कडले, डॉ. सुरेश रावते, डॉ. विनायक खेडकर, डॉ. अभय धानोरकर यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, तज्ज्ञ आणि मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. महिलांनी रजोनिवृत्ती व पीसीओडीसंदर्भातील आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. तसेच आरोग्य यंत्रणेने याबाबत व्यापक जनजागृती करून आवश्यक आरोग्यसेवा प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

आरोग्य उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत मराठवाडा विभागातील स्त्रीरोगतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

कार्यशाळेत रजोनिवृत्ती व्यवस्थापन, पीसीओडीचे निदान व उपचार, समुपदेशन, आरोग्यदायी जीवनशैली, मानसिक व शारीरिक आरोग्य, आधुनिक उपचारपद्धती आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चर्चासत्र आणि प्रश्नोत्तर सत्राच्या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ज्ञान व कौशल्यात भर घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# श्री घृष्णेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद :** श्री घृष्णेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खुलताबाद येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वीच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळाही उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व विवेकानंद शिक्षण संस्थेचे आद्यसंस्थापक कै. पंढरीनाथ पाटील ढाकेफळकर (भाऊ) यांच्या प्रतिमापूजनाने झाली. ....

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय वरकड सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक चे पर्यवेक्षक परमेश्वर हजारे, माध्यमिक चे पर्यवेक्षक विनोद नागपुरे, प्रमुख मार्गदर्शिका शिला भोसले, तसेच सोपान आढाव, जयप्रकाश बिराजदार आणि वरिष्ठ शिक्षक पी. पी. पाटील उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व, शिक्षकांप्रती कृतज्ञता आणि शिक्षणाचे मूल्य यावर प्रभावी भाषणे सादर केली. यावेळी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थी संघर्ष नागे याने नीट परीक्षेत 570 गुण घेतले व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या हर्षवर्धन बाळासाहेब नागे ह्यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य संजय वरकड सर यांच्या हस्ते करण्यात आला अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना शिस्त, नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि मोठी स्वप्ने पाहण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे आयोजन श्री विजयानंद गायकवाड व संगीता शिंदे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामेश्वर राठोड, अनिल गायकवाड, मनोज दोडेवार, गोविंद भगस, रामेश्वर धारे, सविता धिवर , , मिलिंद बोडखे, , सतीश पुंगळे, धीरज मगरे, निकम, आनंद पाटील,निलेश बागडे, खंडागळे, प्रभाकर काकडे आणि कोलते मामा व साजिद भाई यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# पालम येथे 06 ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी, :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व माधवराव पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पालम आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (दिंडोरी प्रणित), नाशिक, शाखा पालम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 06 ऑगस्ट, 2026 रोजी सकाळी 8.30 ते दुपारी 12.30 या कालावधीत पालम येथील माधवराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना खासगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात राज्यातील विविध नामांकित उद्योग, कंपन्या व खासगी आस्थापनांचा सहभाग राहणार आहे. मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी (SFO), क्षेत्र अधिकारी (RO), ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र, कार्यालयीन कर्मचारी (ऑफिस स्टाफ) आदी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी प्रारंभीचे मासिक वेतन रु. 10 हजार ते रु. 25 हजार इतके असून अनुभवाच्या आधारे वेतनात वाढ होऊ शकते. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात भव्य आरोग्य तपासणी

**अजिंठा प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागाने आज, ३० जुलै २०२६ रोजी भव्य "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर" अंतर्गत एक प्रमुख उपक्रम म्हणून सर्वसमावेशक वैद्यकीय आरोग्य तपासणी आणि जनजागृती शिबिराचे यशस्वी आयोजन केले. सिल्लोड-अजिंठा रोडवरील स्वस्तिक लॉन्स, डोंगरगाव फाटा येथे आयोजित या उपक्रमाद्वारे स्थानिक नागरिकांना महत्त्वपूर्ण आरोग्य सेवा पुरवण्यात आल्या तसेच विविध सरकारी योजनांचे थेट लाभ देण्यात आले.

कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये

**भव्य सहभाग:** विविध सरकारी विभागांच्या योजनांचे लाभार्थी, नागरिक आणि ग्रामस्थ अशा एकूण सुमारे २,००० जणांनी या शिबिरात सहभाग नोंदवला आणि मोफत, सविस्तर वैद्यकीय तपासणीचा लाभ घेतला.

**मान्यवरांचा सहभाग:** राज्याचे माजी मंत्री आणि सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार, माननीय श्री. अब्दुल सत्तार साहेब व गटविकास अधिकारी श्री रत्नाकर पगार साहेब यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यांनी स्वतःची आरोग्य आणि रक्तदाब तपासणी करून घेत उपस्थितांसमोर एक उत्तम आदर्श निर्माण केला.



**विभागीय माहिती:** सिल्लोडचे माननीय गटविकास अधिकारी श्री रत्नाकर पगार साहेब व तालुका आरोग्य अधिकारी (THO) डॉ. नासेर खान पठाण आणि सोयगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गीतेश चावडा यांनी आमदार अब्दुल सत्तार साहेब यांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध चालू योजना आणि मतदारसंघातील त्यांच्या प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली.

पुरवण्यात आलेल्या सर्वसमावेशक वैद्यकीय सेवा

वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समर्पित पथकांनी प्रतिबंधात्मक काळजी आणि सामान्य आरोग्यावर लक्ष केंद्रित करून सखोल तपासण्या केल्या.

**असंसर्गजन्य आजार :** उच्च रक्तदाबाचे लवकर निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी पद्धतशीरपणे रक्तदाब (BP) तपासण्या करण्यात आल्या.

**रक्तातील साखरेची तपासणी :** नागरिकांच्या रक्तातील साखरेच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यासाठी मधुमेहाची सखोल तपासणी करण्यात आली.

**सिकलसेल आजार तपासणी :** सिकलसेल आजार असलेल्या व्यक्तींना ओळखण्यासाठी आणि त्यांना मदत करण्यासाठी विशेष सोल्युबिलिटी टेस्टिंग करण्यात आले.

**सामान्य वैद्यकीय काळजी:** सर्व लाभार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेण्यासाठी सखोल शारीरिक आणि सामान्य वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

आरोग्य सेवा योजनांचे गाठलेले प्रमुख टप्पे

स्थानिक नागरिकांपर्यंत आरोग्य विमा आणि मातृत्वाचे लाभ पोहोचवणे हा या शिबिराचा एक महत्त्वाचा उद्देश होता. शिबिरादरम्यान खालील प्रमुख टप्पे गाठण्यात आले.

# रमाई आवास योजनेच्या पहिल्या हप्त्यात दुप्पट वाढ; लाभार्थ्यांना आता मिळणार ₹50 हजार : पालकमंत्री संजय शिरसाट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रमाई आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे वितरण करण्यात आले. राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते लाभार्थ्यांना मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत रमाई आवास योजनेतील घरबांधणीसाठी दिला जाणारा पहिला हप्ता ₹२५ हजारांवरून वाढवून ₹५० हजार करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. केवळ ₹२५ हजारांत घरबांधणीची सुरुवात करणे लाभार्थ्यांसाठी कठीण असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.





रमाई आवास योजनेबाबत लाभार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी सभागृहाबाहेर प्रसिद्ध करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच योजनेच्या कामाला अधिक गती मिळावी यासाठी दर महिन्याच्या १ तारखेला अद्ययावत लाभार्थी यादी प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिल्याची माहिती त्यांनी दिली. समाजकल्याण विभाग आणि महानगरपालिका यांच्यात अधिक प्रभावी समन्वय साधून योजनेची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी प्रत्येक नागरिकाला स्वतःचे घर मिळावे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असल्याचे सांगत छत्रपती संभाजीनगर कोणत्याही घरकुल योजनेत मागे राहणार नाही, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे नमूद केले. रमाई आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी महापौर, पदाधिकारी आणि प्रशासनाचे अभिनंदन केले.

महापौर समीर राजूरकर यांनी लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि विविध टप्प्यांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र समन्वय समिती स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच घरबांधणीचे काम सुरू होताच दुसरा हप्ता तातडीने वितरित करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने राबविल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी प्रास्ताविकात प्रत्येक पात्र लाभार्थ्याला पारदर्शक व न्याय्य पद्धतीने लाभ मिळवून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी योजनेची कार्यपद्धती, पात्रता निकष आणि विविध टप्प्यांची माहिती उपस्थित लाभार्थ्यांना दिली.

कार्यक्रमास उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, गलिच्छ वस्ती निर्मूलन समितीचे सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक त्र्यंबक तुपे, नगरसेविका हर्षदा शिरसाट, कीर्ती शिंदे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

# सीएसएमआरडीएचे कामकाज गतीमान करा; 1 ऑगस्टपासून 'ई-ऑफिस' प्रणाली लागू करण्याचे आयुक्त जी. श्रीकांत यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट असलेल्या ३१३ गावे आणि झालर क्षेत्राचा सुनियोजित व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. पायाभूत सुविधांचा अभ्यास, मॅपिंग आणि विविध विकासकामांचा सखोल आढावा घेतानाच, १ ऑगस्टपासून प्राधिकरणाचे संपूर्ण कामकाज सक्तीने 'ई-ऑफिस' प्रणालीद्वारे सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.



सीएसएमआरडीए कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस प्राधिकरणाचे महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, महानगर उपायुक्त (प्रशासन) लखीचंद चव्हाण यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आयुक्त जी. श्रीकांत यांनी बैठकीत बोलताना सांगितले की, नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा देणे हे प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असून त्याअनुषंगाने प्राधिकरण कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी सर्व गावांतील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद, महसूल आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करावी. तसेच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदारीची निश्चिती करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी लवकरात लवकर योग्य कंत्राटदाराची निवड करण्यात यावी, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच 'आपले सरकार' पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचे तात्काळ निवारण करावे आणि कोणतीही देयके सात दिवसांपेक्षा अधिक प्रलंबित राहणार नाहीत याची काटेकोर दक्षता घेण्यास सांगण्यात आले.

प्राधिकरण हद्दीतील अनधिकृत मालमत्ता तसेच गुंठेवारीसाठी आलेले प्रस्ताव, मंजूर, नामंजूर आणि प्रलंबित प्रस्तावांची सविस्तर माहिती आयुक्तांनी यावेळी घेतली. प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी किमान दोन एकर शासकीय जागा उपलब्ध होण्याबाबत तातडीने पाठपुरावा करावा, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. बैठकीच्या शेवटी मसीआ, क्रेडाई आणि सीएसएन फर्स्टचे प्रतिनिधी व पदाधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.

# शाळांबाहेरील जंक फूडवर बंदीचा निर्णय स्वागतार्ह; विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल : अभाविप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) शाळांच्या प्रवेशद्वारापासून ५० मीटर परिसरात जंक फूडची विक्री, जाहिरात, विपणन आणि मोफत वितरणावर बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप)ने व्यक्त केली आहे. या निर्णयाची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी होऊन विद्यार्थ्यांना सुरक्षित, सकस आणि संतुलित आहाराचे वातावरण उपलब्ध होईल, अशी अपेक्षाही अभाविपने व्यक्त केली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने सुरक्षित, सकस आणि संतुलित आहार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अन्न सुरक्षा व मानके (शाळेतील मुलांसाठी सुरक्षित अन्न व संतुलित आहार) विनियम, २०२० अंतर्गत हा राज्यव्यापी अनुपालन आदेश जारी केला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये जंक फूडचे वाढते सेवन ही गंभीर चिंतेची बाब बनली असून त्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, हृदयविकार तसेच इतर जीवनशैलीजन्य आजारांचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये आरोग्यदायी आहाराचे वातावरण निर्माण करण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे अभाविपने म्हटले आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांच्या आरोग्य, पोषण आणि निरोगी जीवनशैलीच्या विषयावर सातत्याने भूमिका मांडत आली आहे. अभाविपच्या विविध राष्ट्रीय अधिवेशनांमध्ये आणि राष्ट्रीय बैठकींमध्ये विद्यार्थ्यांमधील वाढत्या जंक फूडच्या सेवनाबाबत चिंता व्यक्त करत शैक्षणिक परिसरात आरोग्यदायी आहार, संतुलित जीवनशैली आणि शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन देणारे अनेक प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे एफडीएचा हा निर्णय अभाविपच्या सातत्यपूर्ण भूमिकेशी सुसंगत असून विद्यार्थ्यांच्या हिताचा असल्याचे परिषदेने स्पष्ट केले आहे.

# स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच बोरगाव जहागीर व ताडकळस गावात धावली 'लाल परी'!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**जालना/ भोकरदन :** स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच बोरगाव जहागीर आणि ताडकळस या गावांमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) 'लाल परी' दाखल झाली आहे. अनेक वर्षांपासूनची ग्रामस्थांची मागणी अखेर पूर्ण झाली असून, रामरहीम विद्यालय, सिपोरा बा. यांच्या विशेष पुढाकारातून ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता या बस सेवेचा भव्य शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. गावात प्रथमच एसटी बसचे आगमन होताच विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांनी जल्लोषात तिचे स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि टाळ्यांच्या कडकडाटात 'लाल परी'चे स्वागत करण्यात आले. हा क्षण दोन्ही गावांसाठी ऐतिहासिक ठरला.

नवीन बस सेवा दररोज ताडकळस, बोरगाव जहागीर, मोळवाडी, सिपोरा बा., रामरहीम विद्यालय या मार्गावर धावणार आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून, ग्रामस्थांनाही तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी हक्काचे सार्वजनिक वाहन मिळाले आहे.



या बस सेवा सुरू करण्यासाठी जाफराबाद आगारप्रमुख मा. पंडित साहेब, वाहतूक नियंत्रक जाधव साहेब, तसेच एम. डी. कड, सर्जेरावजी कड आणि चंद्रकांत रांधवण यांनी विशेष सहकार्य केले. शुभारंभ प्रसंगी दोन्ही गावांचे सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच रामरहीम विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायकजी कड, ज्ञानेश्वर महाजन, जनार्धन कुदर, शिवाजी गिरणारे, सुनील लहाने, प्रतिभा उगले, विकास भोकन, प्रद्युम्न काकड, विजय मस्के, सुनील जाधव, गोविंदजी सोनवणे, विकास सोळंकी यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पडेगावच्या सफारी पार्कमध्ये वृक्षारोपण अन् विकासकामांचा आढावा

## छत्रपती संभाजीनगरला हरित व सुंदर बनवण्याचा निर्धार!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरण संवर्धन, हरित वारसा जोपासणे आणि पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगरमधील पडेगाव येथील सफारी पार्क परिसरात नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, महापौर संजय राजूरकर, राजेंद्र जंजाळ आणि अनिल मकरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला असून, यादरम्यान पार्कमधील सुरू असलेल्या विविध विकासकामांची आणि उपलब्ध सुविधांची पाहणी करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर शहराला हरित, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी प्रशासनाकडून विविध पावले उचलली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर पडेगाव येथील सफारी पार्क परिसरात विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. "प्रत्येक वृक्ष हा निसर्गाचा अमूल्य ठेवा असून, त्याचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे," असा संदेश यावेळी उपस्थितांनी दिला. वृक्षारोपणानंतर सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, महापौर संजय राजूरकर, राजेंद्र जंजाळ आणि अनिल मकरिया यांनी सफारी पार्कमधील सुरू असलेल्या विविध विकासकामांची व पर्यटकांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. पर्यटकांना अधिक दर्जेदार सुविधा मिळाव्यात, परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा आणि हे पार्क एक आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून विकसित व्हावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. परिसर अधिक समृद्ध, सुशोभित आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. एक हरित, सुंदर आणि विकसित छत्रपती संभाजीनगर घडविण्याच्या दिशेने प्रत्येक पाऊल दृढ संकल्पाने पुढे टाकले जात असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शहरासह जिल्ह्यात तब्बल 11 तास दमदार पाऊस पिकांसाठी फायदेशीर : कृषिशास्त्रज्ञांचा दावा

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात गुरुवार, ३० पासून सर्वदूर दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. ४ ऑगस्टपर्यंत पावसाचा जोर राहण्याची शक्यता हवामान विभागासह हवामानतज्ज्ञांनी वर्तविली आहे. सर्वदूर जोरदार पावसाची शक्यता असल्याने दक्षतेचा इशारा (ऑरेंज अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्ह्यात गुरुवारी सकाळी ७ वाजेपासून सुरुवात झाली. सायंकाळी ५ वा. पाऊस थांबला असला तरी पावसाळी वातावरण कायम आहे. जिल्ह्यात अधून-मधून हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. जिल्ह्यात सिल्लोडला सकाळपासून दमदार पाऊस पडला. अन्य तालुक्यात हलका ते मध्यम पावसाने हजेरी लावली. विभागीय आयुक्तालयाच्या अहवालानुसार सकाळी १०.४८ वाजेपर्यंत जिल्ह्यात एकूण १४५ मि. मी. पाऊस पडल्याची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, पुढील २४ तासांत तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा म्हणून 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. सायंकाळी ५.५१ वाजेपर्यंत शहर परिसरात २७.६ मि. मी. पाऊस पडल्याची नोंद चिकलठाणा वेधशाळेने केली आहे. दिवसभर कोसळणाऱ्या पावसाने शहर आणि जिल्ह्यातील जनजीवन गारठून गेले आहे.

**मोठ्या पावसाचा अंदाज**

सध्या पावसाचे पुष्य नक्षत्र सुरू असून, ३ ऑगस्टपासून आश्लेषा नक्षत्राचे आगमन होत आहे. वाहन हत्ती असल्याने या नक्षत्रात मोठा पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान अभ्यासक पंजाब डक यांनी वर्तविली आहे. दरम्यान बुधवार, २९ पर्यंत सर्वत्र फवारा स्वरुपाचा पाऊस सुरू होता, गुरुवारपासून पावसाचा जोर वाढला असून, पेरणी झाल्याल्या पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त असल्याचे कृषी शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी सांगितले. उर्वरित ठिकाणी पावसाअभावी खोळंबलेल्या पेरण्याही मार्गी लागल्याचे पवार म्हणाले.

**कमी दाबाचा पट्टा सक्रीय**

मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा राजस्थानातील श्रीगंगानगरपासून मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. मध्य भारतात पूर्व आणि पश्चिमेकडून वाहणाऱ्या परस्पर विरोधी वाऱ्यांचे जोडक्षेत्र सक्रिय आहे. यातच वादळी प्रणाली (डीप डिप्रेशन) मध्य भारताकडे सरकत असल्याने सर्वदूर पावसाला पोषक हवामान तयार झाल्याचे ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी सांगितले.

# प्रत्येक तालुक्यात कोल्ड स्टोरेज उभारणीसाठी पाठपुरावा करा; गंगापूरमधील टोमॅटो रोगाची तातडीने तपासणी करा

## जिल्हा परिषद कृषी समितीच्या मासिक बैठकीत उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी


**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या कृषी समितीची मासिक बैठक गुरुवारी (दि. ३०) दुपारी ३ वाजता जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा कृषी समितीचे सभापती जितेंद्र जैस्वाल यांच्या दालनात पार पडली. बैठकीत शेतकऱ्यांशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा कृषी समितीचे सभापती जितेंद्र जैस्वाल, सदस्य आयेशाबेगम नाशीरहुसेन सय्यद, उत्तम चव्हाण, आजिनाथ धामणे, स्वाती पाटेकर, संगिता अमराव, अर्जुन नितीन पाटील तसेच कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील उपस्थित होते. बैठकीत उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी भाजीपाला, फळपिके व इतर नाशवंत कृषी माल साठविण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कोल्ड स्टोरेज व वेअरहाऊसची सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या. यामुळे शेतकऱ्यांचा माल खराब होणार नाही आणि त्यांना योग्य दर मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. यावेळी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना जिल्हा परिषदेमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध लाभांचा आढावा घेण्यात आला.

# सोयगाव तालुक्यात आठ तास संततधार; जनजीवन विस्कळीत,रस्ते ठप्प; सोयगाव च्या सोना नदीला पूर

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.३० जुलै :** सोयगाव सह तालुक्यात गुरुवारी( ता.३०) पहाटे सात वाजेपासून सुरु झालेल्या रिमझिम पावसाने सकाळी नऊ वाजता जोर वाढवून दुपारी तीन वाजेपर्यंत कमी अधिक जोरात आठ तास संततधार झालेल्या पावसाने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते दरम्यान चार वाजेपासून पुन्हा सायंकाळी सहा वाजेपर्यंत पाऊस सुरूच होता आठ तासाच्या झालेल्या संततधार पावसाने सोयगाव-बनोटी रस्ता दुपारच्या नंतर ठप्प झाला होता काही भागात रस्त्यावर गुडघ्यावर पाणी साचले होते दरम्यान तालुक्यातील जनजागृती पूर्णपणे विस्कळीत झाले होते शेतात पाणीच पाणी साचून कोवळी पिके पाण्यात बुडाली आहे काही भागात शेती पाण्यात गेली आहे दरम्यान गुरुवारी झालेल्या पावसाने दुपारी तालुक्यातील सर्वच नदी नाले तुडूंब भरून वाहत होती जरंडीच्या खडकी नदीला पूर आला होता



---सोयगावचे वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो

सोयगाव सह तालुक्यात झालेल्या कमी अधिक जोरात संततधार पावसाने सोयगावचे वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो झाले असून या धरणाच्या सांडव्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे त्यामुळे सोयगावच्या सोना नदीला मोठा पूर आला आहे.

# खुलताबाद शहरातील भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिम

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी खुलताबाद नगरपरिष दे मार्फत शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचे संरक्षण करणे तसेच रेबीजसारख्या संसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण (Animal Birth Control – ABC) व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे.



सदर मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्याधिकारी श्री समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेमार्फत प्राणी जन्म नियंत्रण समिती गठित करण्यात आली असून संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष पथकही तयार करण्यात आले आहे.

मोहिमेदरम्यान भटक्या श्वानांना प्राणी कल्याण नियमांचे पालन करून सुरक्षित व मानवीय पद्धतीने पकडण्यात येत असून त्यांचे निर्बिजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण WVS HOPE जांभाळा ता.गंगापुर या संस्थे मार्फ़त करण्यात येत आहे. शस्त्रक्रियेनंतर आवश्यक उपचार व निरीक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित श्वानांना त्यांच्या मूळ परिसरात सुरक्षितपणे सोडण्यात येत आहे.

आजपर्यंत नगरपरिषदेमार्फत एकूण ७१ भटक्या श्वानांचे यशस्वीरित्या निर्बिजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले असून ही मोहीम शहरातील उर्वरित भागांमध्येही टप्प्याटप्प्याने सुरू राहणार आहे.

खुलताबाद नगरपरिषद सर्व नागरिक, संस्था, आस्थापना व प्रतिष्ठानांना आवाहन करते की, सदर मोहिमेस पूर्ण सहकार्य करून शहर स्वच्छ, सुरक्षित व रेबीजमुक्त ठेवण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.


**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911